वर्ष २०
अंक ३ रा
१५ सप्टेंबर १९४६

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत
३
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मोहनिद्रा—३ ... ... ... ... | ४३ |
| २ | पावित्र्याचें उच्चाटण ... ... ... | ४८ |
| ३ | समंजस समाजवाद ... ... ... | ५३ |
| ४ | गणपति उत्सव ... ... ... ... | ५६ |
| ५ | पत्रव्यवहार ... ... ... ... | ५८ |
| ६ | शारदेचें पत्र ... ... ... ... | ६१ |



## स मा ज स्वा स्थ्य

### वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी दोन रुपये, व्ही. पी. ने सवादोन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर अडीच रुपये किंवा चार शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. नमुना अंक ( आम्हास वाटेल तो ) फुकट पाठवूं. पुणें येथील ग्राहकांनी ६९-१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें, येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, मुंबई ४



पुरोगामी मतांची मैत्रीण पाहिजे. लिहा : ‘ वसंत ’ C/o **समाजस्वास्थ्य.**

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मोहनिद्रा—३

मोहनिद्रा सर्वांची सारखीच असते असें नाही. कित्यकांना गाढ झोप लागते, कित्येकांना लागत नाही. पण मोहनिद्रेची जितकी संवय होईल तितकी ती अधिक गाढ होत जाते. अर्थात् चार ते सहा वेळां असे प्रयोग झाल्यावर त्या रोग्याच्या बाबतींत गाढतेची सीमा पोंचते, परंतु ही सीमा प्रत्येकाची वेगळी असते. यामुळे कित्येक प्रयोजक रोग्यांची वर्गवारी लावतात. यांत अेकंदर तीन वर्ग मानतां येतील. १ हलकी झोप, यांत बाह्य जगाची थोडीतरी जाणीव असते. २ चांगली झोप, आणि ३ गाढ झोप. या शेवटच्या दोन अवस्थांत मनुष्य गेला तर या स्थितींत काय झालें याची त्याला जागा झाल्यावर बिलकुल आठवण नसते.

या झोपेंतून रोग्याला जागा करण्याकरतां सामान्यतः तशी सूचना दिल्याने काम होतें. कधी कधी डोळ्यांवर फुंकर घालणें, वारा घालणें, अंगावर पाणी शिंपडणें, मोठ्यानें हांक मारणें किंवा आवाज करणें, वगैरे प्रकार करावे लागतात. परंतु या सर्वांची जरूर नसते. फारतर डोळ्यांवर फुंकर घालावा, परंतु याचा परिणाम देखील सूचनेवरच अवलंबून असतो. प्रयोजक वाकबगार असल्यास रोगी ताबडतोब चांगला जागा होतो, परंतु प्रयोजकाला याची संवय नसल्यास तो जागा होत नाही अितकेंच नाही तर तो प्रयोजकाच्या ताब्यांत यानंतर रहात नाही, म्हणजे त्याला धड जागाही करतां येत नाही आणि पुन्हा झोपही लावतां येत नाही. यांत बराच धोका असतो आणि नवशिक्यांनी या बाबतींत

सावध राहिलें पाहिजे. डॉ. सालो यांनी अेका मेजवानीचे प्रसंगीं गंमतीने केलेल्या अेका प्रयोगाची हकीकत दिली आहे (१८९१, न्यूयॉर्क मेडिकल जर्नल). अेका तरुणाला मोहनिद्रेंतून जागा करण्याचा प्रयत्न करतांना त्याला कांपरें भरलें. असे तीनदां पुन्हा प्रयत्न केले, तेव्हां तो जमिनीवर पडून गडबडां लोळूं लागला, नंतर उठून उड्या मारून नाचूं लागला, आणि नंतर त्याला झटके येऊं लागले आणि वाचा बसली. नंतर हातांशिवाय बाकीचें शरीर लांकडासारखें ताठ झालें. हे प्रकार दोन दिवस चालू होते आणि कोणताही चकचकीत पदार्थ पाहतांच त्याला वेड लागल्यासारखें होअी. त्याला शांत करण्याकरतां अनेक औषधें देऊन पाहिलीं, पण दहा दिवसपर्यंत कांही परिणाम झाला नाही. नंतर थोडा आराम वाटला, पण मधून मधून गाणें आणि रडणें चालू होतें. आणखी बारा दिवसांनी तो बरा झाला, पण या अवधींत त्याला १०३ पर्यंत ताप होता.

तेव्हा शहाणपणाचा मार्ग म्हणजे मनुष्य जागा होत नाही असें दिसल्यास ताबडतोब अेखाद्या अनुभवी प्रयोजकाला बोलावून आणावा, किंवा त्याला झोपूं द्यावा. त्याला जागा करण्याचे प्रयत्न पुनः पुनः केल्यानें नुकसानच होअील. मनुष्य आपोआप केव्हा जागा होअील याचा नियम नसतो. अेखादा मनुष्य प्रयोजक निघून गेल्याबरोबर ताबडतोब जागा होतो, अेखादा मोठ्या आवाजाने जागा होतो. अेक मनुष्य तर मोहनिद्रेंत मोठ्याने हंसण्याची सूचना दिल्यावर त्याच्या स्वतःच्या हंसण्याच्या आवाजानेच जागा झाला. जागा होण्याची सूचना न दिल्यास कमजास्त झोप झाल्यावर रोगी जागा होतो. बेर्नहाअिम यांचा अेक रोगी अठरा तासपर्यंत झोपेंतच होता. सामान्यतः रोगी जागा झाल्यावर मोहनिद्रेचें कोणतेंही चिन्ह रहात नाहीं.

अमुक प्रकारच्या माणसांवर मोहनिद्रेचा प्रयोग अधिक यशस्वी होतो म्हणणें कठिण आहे, कारण अनुभवी प्रयोजकांचा अनुभव असा आहे की निदान शेंकडा अैशी लोकांवर हा प्रयोग यशस्वी होतो. सामान्यतः सुशिक्षित तरुणांवर तो यशस्वी होण्याचा संभव अधिक. विशेष हुशार किंवा विशेष मूर्ख आणि घमेंडखोर लोकांवर संभव कमी. वेडसर लोकांवर तो यशस्वी होत नाही

आणि वेड लागलेल्या लोकांवर यशस्वी होणें कठिण असतें. स्त्रीपुरुषांत या बाबतींत फारसा फरक नाही. ज्यांना हिस्टेरिआ असेल त्यांच्यावर मोहनिद्रेचा प्रयोग अधिक यशस्वी होतो ही कल्पना चुकीची आहे. वेगवेगळ्या देशांतील लोकांतही फारसा फरक दिसत नाही.

आतां मोहनिद्रेंत सामान्यतः कोणते विशेष दिसतात तें पांहूं. यांतला अेक मोठा विशेष असा की निद्रावस्थेंत दिलेल्या कोणत्याही सूचनेचा परिणाम रोग्याच्या मज्जासंस्थेवर होतो. याचा तपशील पुढें पाहूं. सध्या ही निद्रा कशा प्रकारची असते हें प्रथम पाहूं. झोप हलकी असल्यास रोगी मोकळेपणाने हालचाल करतो, उदाहरणार्थ तोंडावर माशी बसल्यास तिला घालवण्याकरतां तो हात हालवतो, किंवा एकाच आसनाने थकवा आल्यास तें बदलतो, पण कधी कधी झोप जास्त गाढ असते. अशा वेळीं श्वासोच्छ्वास नेहमीपेक्षां लांब आणि सावकाश होतो. नाडी देखील सावकाश चालते, पण तिचा जोर जास्त असतो, आणि श्वासांत व नाडींतही अधिक नियमितपणा दिसतो. पण मनुष्य मोहनिद्रेंत जातांना मात्र नाडी व श्वास अधिक जलद चालतात व नंतर त्यांचा वेग कमी होतो. तसेंच निद्रा लागतांना रोगी जो श्वास आंत घेतो, तो कांहीं विशिष्ट प्रकारचा असतो आणि डॉक्तराला तो संवयीने ओळखतां येतो, आणि यामुळें निद्रेचा प्रभाव सुरू झाला असें ताबडतोब समजतें.

चांगली झोप लागली म्हणजे रोगी अगदी स्तब्ध राहतो. त्याचें आसन अर्धा तास झाला तरी बदलत नाही. हात, पाय, डोकें, बरोबर असतील त्या स्थितींत कायम राहतात. त्याला चांगलें अैकूं येत असतें, पण त्याच खोलींत कोणी अेखादी मौजेची गोष्ट सांगितली तरी त्याच्या चेहऱ्यावर बिलकुल फरक दिसत नाही. त्याचे डोळे सामान्यतः मिटलेले असतात आणि ते उघडण्याचा प्रयत्न केल्यास तो जागा होण्याचा संभव असतो, पण जेव्हां प्रयोजक मोहनिद्रा आणण्याकरतां स्वतःच्या डोळ्यांकडे त्याला पहायला सांगतो, तेव्हा मोहनिद्रेंत देखील ते ताठ उघडे राहतील. पण अत्यंत गाढ झोपेंत जरी सामान्यतः डोळे मिटलेले असले, तरी मधें अेक बारीक फट राहते आणि त्यांतून बुबुळ दिसतें.

मोहनिद्रेचा परिणाम चेहऱ्याच्या स्नायूंवर असा होतो की सामान्यतः ओठ नेहमीपेक्षा किंचित् जास्त घट्ट मिटतात आणि कित्येक वेळां स्नायूंच्या आकुंचनामुळे चेहऱ्यावर कृत्रिम स्मित दिसतें. अर्थात् हा परिणाम केवळ शारीरिक असतो आणि रोग्याची त्या वेळीं करमणूक होत नसते.

झोप पुरेशी गाढ लागली असल्यास रोग्याला केवळ सूचनेने कोणतीही हालचाल करायला लावतां येते, किंवा बंद करायला लावतां येते. उदाहरणार्थ 'तुला तोंड उघडतां येणार नाहीं,' किंवा ' हात वांकवतां येणार नाही', असें सांगितल्यास तो तोंड उघडण्याचा किंवा हात वांकवण्याचा प्रयत्न करीत असूनही त्याला तसें करतां येत नाही असे प्रेक्षकांना दिसतें. पण यावरून अेक गोष्ट उघड होते की यांत दोन परस्परविरोधी सूचना आहेत. ' तोंड उघडतां येणार नाही ' असें सांगितल्यास वास्तविक त्यांत त्याने तोंड उघडण्याचा प्रयत्न करावा अशी प्रत्यक्ष सूचना नाही, परंतु ' उघडतां येणार नाही ' याचा अर्थ ' प्रयत्न केला तरी उघडतां येणार नाही ' असा असल्यामुळे त्याने प्रयत्न करावा, म्हणजे तो यशस्वी होत नाही असें दिसेल, अशी दुहेरी सूचना तो अंमलांत आणतो. ' डोळे उघडतां येणार नाहीत ' असें सांगितल्यास त्याला पापण्या तर उघडतां येत नाहीतच, पण शिवाय तो भुंवया शक्य तितक्या वर उचलून कांही परिणाम होतो की काय हें पाहतो, पण परिणाम होत नाही.

केवळ तशी सूचना दिल्यानें हंसणें, रडणें, खोकणें, शिंकणें, वगैरे कोणतीही क्रिया करायला लावतां येते, किंवा कोणत्याही स्नायूचें काम बंद पाडतां येतें. बऱ्याच भानगडीच्या कृति देखील रोग्याकडून अशा रीतीनें करवून घेतां येतात. या सूचना शब्दांनीच केल्या पाहिजेत असेंही नाही. प्रयोजकाला काय पाहिजे आहे हें त्याला कळलें म्हणजे झालें. अेखादे वेळीं स्पर्शानें किंवा डोळे उघडे असल्यास डाक्तराच्या अितर कांही हालचालींचाही सूचनेसारखाच परिणाम होतो. जेव्हा डाक्तर व रोगी अेकमेकांकडे टक लावून पाहतात, तेव्हा डाक्तराचें अनुकरण करण्याची रोग्याची प्रवृत्ति असते. डाक्तराने हात उचलला तर रोगी हात उचलतो, त्याने गुडघे टेकले तर हा तसेंच करतो. रोग्याच्या

डोळयांपुढें डाक्तराने बोट धरल्यास नंतर तें जिकडे न्यावें तिकडे रोग्याची दृष्टि जाते, कारण तिकडे पहावें अशी डाक्तराची अिच्छा असावी असें त्याला वाटतें. येथे प्रत्यक्ष सूचनेची जरूर लागत नाही. डाक्तर केवळ डोळयांनी खूण करून देखील सूचना देऊं शकतो आणि रोग्याचें लक्ष डाक्तरावर खिळलें असल्यामुळे हें सोपें होतें. प्रेक्षकांना या सूचना पुष्कळ वेळां कळत नाहीत आणि अिच्छा असल्यास त्यांना सहज चकवतां येतें.

रोग्याच्या स्नायूंवर अंमल येथपर्यंत चालवतां येतो की डाक्तराने रोग्याचा हात आपल्या हाताने उचलला, आणि नंतर सोडून दिला, तर कोणतीही सूचना नसतांना तो हात नेहमीप्रमाणें खाली न पडतां तसाच वर राहतो. म्हणजे डाक्टराची अिच्छा असेल तेवढेंच करायचें, आपण होऊन कांही करायचें नाहीं, अशी प्रवृत्ति असते. पण निद्रा पुरेशी गाढ नसल्यास प्रत्यक्ष सूचना दिली नाही तर हात खाली पडतो. येथे देखील तोंडानें न सांगतां डाक्तराने कांही क्षण हात उचलून धरला आणि दुसरा हात त्या हातावरून फिरवला, तर तेवढ्याने तो ताठ रहावा अशी सूचना मिळते. जितकी मोहनिद्रेची संवय जास्त असेल तितकी अल्पसूचनाही ओळखण्याची संवय होते आणि प्रेक्षकांना फसवणें सोपें होतें. सूचनेने हात ताठ केला असतां तो अितका ताठ होतो की रोग्याला आपण होऊन तो तितका ताठ कधींच करतां येत नाहीं.

अशाच सूचनेने रोग्याचे पाय अेका खुर्चीवर, आणि शरीर ताठ करून डोकें दुसऱ्या खुर्चीवर, ठेवल्यास शरीर बिलकुल वांकत नाही, अितकेंच नव्हे तर अेका सामान्य तरुणानें अशा स्थितींत शरीरावर मधें ठेवलेलें दीडशें पौंडांचें वजन सहज पेललें आणि त्याच्यावर याचा कोणताही वाअीट परिणाम झाला नाही.

सूचनेचा परिणाम जसा स्नायूंवर होतो, तसाच ज्ञानेंद्रियांवरही होतो. ‘ आतां वास येणार नाही ’ असें सांगितलें, आणि मग ॲमोनिआ नाकाशीं धरला तरी कोणताही परिणाम होत नाही. त्याचप्रमाणें ‘ ही साखर आहे ’ असें सांगून मिरपूड दिली, किंवा ‘ बरफी आहे ’ असें सांगून साबणाची वडी

दिली, तर रोगी मोठ्या चवीने खाअील. गाढ झोप लागल्यास अंगांत टांचणी टोंचली तरी दुखत नाही आणि 'आतां तुला वेदना होणार नाहीत' अशी सूचना दिली तर शस्त्रक्रिया देखील दुखल्याशिवाय करतां येतात.

या स्थितींत रोग्याला स्वतः विचार करतां येत नाही, जें सांगावें तें खरें वाटतें. 'तूं सेनापति आहेस' असें सांगितलें तर तो तसा वागण्याचा प्रयत्न करील, अितरांना हुकूम सोडील, वगैरे. पण जें काम त्याने कधीच केलें नाही तें त्याला अर्थातच करतां येणार नाहीं उदाहरणार्थ शिवण्याच्या यंत्राची माहिती नसल्यास तो तें चालवूं शकणार नाही, पण तो प्रयत्न जरूर करील. स्मरणशक्तींत देखील सूचनेने फरक करतां येतो, निदान तात्पुरती तरी स्मरणशक्ति वाढवतां येते, किंवा रोग्याचें लक्ष यावेळीं केंद्रित झाल्यामुळें ती आपोआपही वाढते. अशा निद्रेंत त्यानें अेखादें भाषण अैकलें तर तो पांच मिनिटांनी त्यांतलें बरेंच म्हणून दाखवील, निदान नेहमीपेक्षा जास्त दाखवील.

निद्रा पुरेशी गाढ नसेल, तर निद्रेंत काय झालें हें नंतरही लक्षांत राहतें, पण गाढ असल्यास लक्षांत रहात नाहीं. लक्षांत रहायला पाहिजे असेल तर तशी सूचना द्यावी लागते. अेरवीं 'तूं निद्रेंत अमुक केलेंस' असें सांगितलें तर त्याला आश्चर्य वाटतें. पण पुन्हा मोहनिद्रा लागल्यास मात्र मागच्या निद्रेंतील सर्व गोष्टी त्याला बरोबर आठवतात. म्हणजे त्याच्या आयुष्याचे दोन भाग पडतात. मोहनिद्रेंत काय केलें हें मोहनिद्रेंतच आठवतें, आणि अेरवीं काय केलें हें मोहनिद्रेंत आठवत नाही. (अपूर्ण)

---

# पावित्र्याचें उच्चाटन

क्लीबनीतीचें स्तोम माजवणाऱ्या लोकांचें मन कामविषयक विचारांनीं अितकें भारलेलें असतें की नीति, शील, पावित्र्य हे सगळे शब्द त्यांना कामविषयकच वाटतात, आणि तरीदेखील, कामविषयक विचार घाणेरडे असतात, त्यांपासून दूर रहावें, असा उपदेश ते अितरांना करीतच असतात. येथील

'सोशल प्यूरिटी लीग' ( समाज–पावित्र्य–संघ ) अशाच लोकांनीं काढलेला आहे. त्यांचें काम अितकेंच की लोक आपापल्या जननेंद्रियांचा उपयोग कशा रीतीने करतात यावर पहारा ठेवून तो उपयोग संघाच्या कल्पनांशीं जुळता नसला तर त्याबद्दल आरडाओरडा करणें, आणि जमलें तर आपल्या मताला पोषक असे कायदे करून घेणें. या संघांत कांही बडे पारंपरिक लोक असल्यामुळें त्यांना कायद्याचाही शक्य तितका पाठिंबा मिळतो आणि ते लोकांना शक्य तितकें सतावण्याचें आपलें काम उत्तम रीतीने पार पाडीत असतात.

खरें पाहिलें तर मनुष्य आपल्या शरीराचा उपयोग जोंपर्यंत दुसऱ्याला त्रास देण्याकडे करीत नाही, तोंपर्यंत शरीराच्या कार्यासंबंधी त्याला पूर्ण मुभा असली पाहिजे. परंतु अितका समंजसपणा धार्मिक लोकांत कसा सांपडणार? डोळ्यांचा उपयोग न करण्यांत ज्याप्रमाणें कांही पुण्य नाही, त्याचप्रमाणें इतर कोणत्याही अिंद्रियांचा उपयोग न करण्यांतही कांहीं पुण्य नाही, हें त्यांना कळत नाही. अर्थात् धार्मिक समजुती मोठ्या विचित्र असतात, पण तरीदेखील ज्या त्या धर्माच्या लोकांनी आपापल्या विचित्र समजुतींप्रमाणें वागावें यांत कोणालाच कांही गैर दिसणार नाही. पण धार्मिक लोकांचें अेवढ्याने समाधान होत नाही. अितरांनीही आपल्या समजुतींप्रमाणें वागलें पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो. अमेरिकेंत रोमन कॅथोलिक पंथाचे लोक संततिनियमनाच्या विरुद्ध असल्यामुळे त्यासंबंधी माहिती कोणालाच मिळूं नये अशी त्यांची खटपट असते आणि ते पाताळयंत्री लोक असल्यामुळे सरळ मार्गाने न जमलें तर आडमार्गानेही आपला हेतु सिद्धीस नेतात.

केवळ धार्मिक समजुतींना अितर धर्मांचे लोक भीक घालणार नाहीत, तेव्हां आपल्या वेडगळ समजुतींना पाठिंबा म्हणून धार्मिक लोक राजरोस थापा मारीत असतात. उदाहरणार्थ ब्रह्मचर्याच्या उत्कृष्ट परिणामांविषयीं प्रवचनें पुष्कळांनी अैकलीं असतील. अर्थात् या प्रवचनांत सत्याचा लवलेश देखील नाही. जो दारू किंवा अितर मादक पदार्थांचें सेवन करीत नाही, तो अधिक सामर्थ्यवान असतो असें म्हटलें तर त्याला कांही अर्थ आहे, कारण फाजील उत्तेजनाने शरीराची

हानि होणें शक्य आहे, परंतु तहान लागल्यावर पाणी पिणें जितकें नैसर्गिक आहे, तितकेंच कामेच्छा झाल्यास समागम करणें आहे. तेव्हां तहानेपुरतें पाणी पिण्याने जसें नुकसान होत नाही, तसेंच अतिरेक न झाल्यास समागमानेही नुकसान होत नाही. तहान लागल्यावर पाणी न पिणें जसें निसर्गविरुद्ध आहे, तसेंच कामेच्छा झाल्यावर समागम न करणें आहे, आणि अशा वागणुकीची म्हणजे ब्रह्मचर्याची स्तुति करणें हा केवळ धार्मिकांचा आचरटपणा आहे. समागमानंतर थोडाबहुत थकवा येतो हें खरें आहे, पण कोणताही व्यायाम केल्यानें थकवा येतो, म्हणून कोणीही कोणताही व्यायाम करूं नये म्हणणें शहाणपणाचें होईल काय ?

ब्रह्मचर्यानें फायदा तर होत नाहींच, पण अशा निसर्गविरुद्ध आचरणाचें प्रायश्चित्त शेवटीं मिळाल्याशिवाय रहात नाही. प्रसिद्ध फ्रेंच लेखक लेऑं ब्लं यांनी आपल्या विवाहावरील पुस्तकांत लिहिलें आहे की 'मनुष्याचें आयुष्य कसें वाढेल याचा विचार प्रो. मेचनिकॉफ यांच्या इतका कोणीही केला नसेल, आणि या विद्वानाच्या मतें ब्रह्मचर्य हें मनुष्यजातीला अत्यंत हानिकारक आहे, आणि विशेषतः स्त्रियांचे बाबतींत त्यांचें म्हणणें असें आहे की त्यांचे योनिसार्गातील पडद्याने अतिशय नुकसान होतें, म्हणजे कौमार्य जितकें जास्त टिकेल तितकें अधिक नुकसान होतें. त्याचप्रमाणें डॉ. आर्नो यांनी सांगितलें आहे की धंदेवाईक ब्रह्मचाऱ्यांना (म्हणजे रोमन कॅथोलिक पाद्र्यांना) मज्जातंतूंचे, रुधिराभिसरणाचे आणि जननेंद्रियांचे रोग इतरांपेक्षा जास्त प्रमाणांत होतात. आणि डॉ. आर्नो हे लेखक पारंपरिकच आहेत हें यांत विशेष आहे.

कित्येक डाक्तर ब्रह्मचर्याची प्रशंसा करतात, पण स्वतः तसे वागत मात्र नाहीत. नियमित समागमाने जी समाधानी वृत्ति उत्पन्न होते, ती सोडून ब्रह्मचर्याने उत्पन्न होणारा उद्वेग कोण पसंत करील ? आणि विवाहापर्यंत ज्या ब्रह्मचर्याने राहिलेल्या असतात, अशा मुलींत विवाहाने किती फरक होतो, त्या एकदम किती जास्त टवटवीत दिसूं लागतात, हें कोणालाही सहज दिसण्यासारखें आहे. जेव्हां मुलींचीं लग्नें बाराव्या वर्षी होत होतीं, तेव्हां हें

दिसून येण्यास मार्ग नव्हता, पण हल्लीं मुलींचीं लग्नें बरींच लांबणीवर पडूं लागल्यापासून हा फरक पुष्कळ वेळां पहायला मिळतो. खरें पाहिलें तर ब्रह्मचर्य हा भयंकर अतिरेक आहे आणि कोणत्याही अितर अतिरेकाप्रमाणें त्याचेही परिणाम घातकच होतात. त्याने मनुष्य अशक्त आणि निस्तेज होतो.

ब्रह्मचाऱ्यांचा स्वभावही त्रासिक होतो, कारण अितरांचें सुख त्यांना पाहवत नाही. आपलें त्यापासून नुकसान होत आहे याची जाणीव त्यांना असते आणि यामुळें त्यांना अितरांचा हेवा वाटतो. मनुष्य ब्रह्मचारी राहतो तो केवळ जुलुमाने, लोक काय म्हणतील या भीतीने राहतो. तो स्वखुषीने राहिला तर त्याचे तितके हाल होणार नाहीत. निदान तो अितरांचा तितका हेवा करणार नाहीं. पण ज्यांना ब्रह्मचर्याची अेक प्रकारची सक्तीच असते, त्यांची मनःस्थिति कशी चांगली रहावी?

समागमाने पावित्र्य नष्ट होतें अशी कल्पना कांही धर्मांत आहे आणि म्हणूनच येशू क्रिस्ताची आअी मेरी हिला समागमाशिवायच गर्भ राहिला अशी कल्पना क्रिस्ती धर्मांत आहे. धार्मिक लोकांची अशीही कल्पना असते की धार्मिक विवाह केल्यावर मग समागमाने स्त्रीचें पावित्र्य नष्ट होत नाही. पण विवाहाचे मंत्र म्हटले नाही तर मात्र पावित्र्य नष्ट होतें. या कल्पना हास्यास्पद नाहीत असें कोणता समंजस मनुष्य म्हणेल?

अर्थात् पुष्कळ समाजांत कामवासनेच्या तृप्तीच्या मागात अितक्या अडचणी उभारलेल्या असतात की त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा ब्रह्मचर्य पुरवलें असें पुष्कळांना वाटणें साहजिक आहे, पण याचा अर्थ अितकाच की जो भित्रा असतो तोच ब्रह्मचर्य पसंत करतो, आणि हा मोठासा स्पृहणीय गुण आहे असें कोणी म्हणणार नाही. भयंकर अनीतीचा आरोप येण्यापेक्षा ब्रह्मचर्य बरें असें वाटणें साहजिक आहे, पण अशा प्रकारची समाजव्यवस्था आरोग्याच्या दृष्टीने अिष्ट आहे असें कोणताही तज्ञ म्हणणार नाहीं. ब्रह्मचर्यापासून होणाऱ्या फायद्यांविषयी कोणी कितीही थापा दिल्या तरी त्यांना शारीरशास्त्राचा पाठिंबा नाही. समागमासंबंधी निर्बंध ज्या समाजांत कमी

असून ब्रह्मचर्याचा बडेजाव केला जात नाही, त्यांतील लोक निःसंशय अधिक सुखी आणि आनंदी असतात. निसर्गविरुद्ध वागणूक कधीही सुखकर होणें शक्य नाही.

अर्थात् कोणत्याही पारंपरिक समाजांत स्त्रियांच्या कौमार्यालाच विशेष महत्व असतें. पुरुषांचें कौमार्य कोणाला कळणेंच शक्य नसतें, तेव्हां तें शिल्लक आहे की नाही हें कसें ठरवणार? स्त्रियांच्या बाबतींत योनिमार्गांतील पडद्यामुळें हें कळणें शक्य असतें, म्हणूनच त्याला महत्व प्राप्त झालें आहे. ही कल्पना रानटी आहे यांत शंका नाही. मालकीहक्काच्या कल्पनेवर ही आधारलेली आहे. वापरलेला कपडा जसा कोणाला आवडत नाही, तशीच आपली स्त्रीही कोणी वापरलेली नसावी असा पुरुषांचा आग्रह असतो. प्रथमसमागमाच्या वेळीं स्त्रीला थोडीशी अिजा होते, जखम होते, रक्तपात होतो, आणि या सर्व गोष्टींत पुरुषाने आनंद मानावा हा रानटीपणा नव्हे काय? हल्ली सुधारलेल्या देशांतील बऱ्याच पुरुषांना हा प्रकार आवडत नाहीं, निदान कौमार्यभंगाने समागमाचें सुख वाढत नाही आणि आपल्याला तें बिलकुल पसंत नाही असें कॅसानोव्हासारख्या प्रसिद्ध समागमतज्ञाने लिहून ठेवलें आहे. सारांश स्त्रियांच्या कौमार्याला आजपर्यंत फाजील महत्व मिळालेलें आहे आणि यामुळे स्त्रियांनीही कौमार्याला फाजील महत्व दिलेलें आहे. स्त्रियांचें कौमार्य सहज दिसून येण्यासारखें असल्यामुळे आणि विवाहापूर्वीच कौमार्यभंग झालेल्या स्त्रीला शिष्ट समाजांत स्थान नसल्यामुळे यांत नवल कांहींच नाही, पण यांत समंजसपणा बिलकुल नाही. विशेषतः हल्ली पुष्कळ लोक विधवांशीं देखील विवाह करतात आणि ती अक्षतयोनि असली पाहिजे असा आग्रह सर्वच धरतात असें नाही. पण तरीदेखील असा मनुष्य सुद्धां स्त्रीचा प्रथमविवाह असेल तर ती कुमारीच असली पाहिजे असा आग्रह धरील. कारण तो कौमार्याचा संबंध पावित्र्याशीं जोडतो, आणि विवाहाशिवाय तें नष्ट होणें भयंकर समजतो. ही धार्मिक भावना आहे आणि शारीरशास्त्राला ती संमत नाही, हा विचार त्याला सुचणार नाही.

हा केवळ परंपरेचा परिणाम आहे हें सहज दिसतें. जेथें तशी परंपरा

नाही, तेथें कौमार्याचें महत्त्व नसतें. जपानांत वेश्येचा धंदा केलेल्या मुलीचेंही लग्न होऊं शकतें. चीन देशांत मध्यम वर्गांतील कित्येक लोक वेश्यागारांतून वधू पसंत करतात. यूरोपांतही कौमार्याचें महत्त्व कमी होत आहे, आणि अलीकडील कादंबऱ्यांत कित्येक नायिका आपलें कौमार्य शिल्लक असलें तरी तें नाही असें भासवतात.

योनिमार्गांतील पडदा ऋतुप्राप्तीपूर्वीच डाक्तराकडून काढवण्याची चाल पडल्यास कौमार्याचें बिलकुल महत्त्व राहणार नाही, आणि तशी चाल पडणें स्त्रियांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही अिष्ट आहे हें उघड आहे. याचा आणखी अेक फायदा असा होअील की ज्यांची इच्छा असेल त्यांना प्रथमसमागमाचे वेळींही संततिनियमनाचीं साधनें वापरतां येतील.

---

# समंजस समाजवाद

मर्क्सप्रणीत समाजवादाचा पुरस्कार करून त्याचें उदाहरण म्हणून रशियाकडे बोट दाखवणाऱ्या समाजवाद्यांना अंधश्रद्धेमुळे दुसरें कांही दिसतच नाहीसें होतें आणि रशियाचेंच अनुकरण अितर सर्व देशांनी करावें अशा धोरणाने त्यांच्या कारवाया चाललेल्या असतात. रशियांत आज अेक प्रकारचा समाजवाद अंमलांत आहे यांत शंका नाही, परंतु तो ज्या पद्धतीने अंमलांत आला आणि ज्या दिशेने तो आज चालला आहे, त्यांत आदर्श असें कांहीच नाही आणि आज त्याचा कल साम्राज्याकडे झुकल्यामुळे सर्व जगाला त्यापासून धोका उत्पन्न झाला आहे हें सर्वांना स्पष्ट दिसत आहे. पण समाजवाद म्हणजे जर रशियाप्रमाणेंच व्यक्तिस्वातंत्र्याचा सर्वस्वी नाश आणि अेखाद्याच माणसाची हुकूमशाही असेल, तर तो कोणत्याही अितर जुलुमाअितकाच जाचक होअील यांत शंका नाही. व्यक्तिस्वातंत्र्याची आणि जागतिक शांततेची दृष्टि ज्यांत कायम राहील, असा अेखादा समाजवादाचा प्रकार असूं शकेल, अशी अंधुक शंका देखील मार्क्सवाद्यांच्या डोक्यांत येत नाही, पण ज्याला जुलुमाची चीड

आणि व्यक्तिस्वातंत्र्याची चाड आहे, अशा कोणालाही रशियन पद्धतीचा समाजवाद स्पृहणीय वाटणार नाही.

कोणाही मनुष्याच्या हातांत अधिकार आला की तो बहुधा जुलूम करूं लागतो, असा सार्वत्रिक अनुभव आहे, आणि कोणाच्याही हातीं अधिकार न देणें, अेवढा अेकच याला उपाय आहे. पण तो न दिला तर अेकंदर देशाचे कारभार चालणार कसे, अशी शंका पुष्कळांना आल्यामुळें ते अधिक विचारच करीत नाहीत. परंतु अशा प्रकारच्या अराजकतेचा पुरस्कार करणारा पंथ बराच जुना आहे. पुष्कळ लोकांना अराजकता याचा अर्थ अव्यवस्था असाच वाटतो, पण जे अराजकतेचा पुरस्कार करतात ते अशा अर्थानें करीत नाहीत. जेथे राजा नाही, अितकेंच नव्हे तर राजासारखाच अधिकार असलेला अेखादा अध्यक्ष देखील नाही, अशा देशाला अराजक म्हणतां येअील. पण हें शक्य आहे काय, आणि व्यवहार्य आहे काय, याचा तात्विक विचार करण्याअैवजी येथे पुढील प्रत्यक्ष घडलेलें उदाहरण घेणें अधिक फलप्रद होअील.

अशा प्रकारचा अेक प्रयोग नुकताच, म्हणजे १९३६ सालीं, स्पेनमध्यें केलेला होता आणि तो बऱ्याच अंशीं यशस्वी झालेला होता. गॅस्तॉं लॅव्हॅल नांवाच्या अेका फ्रेंच लेखकाने त्याची हकीकत १९३८ सालीं प्रसिद्ध केलेली आहे. स्पेनमधील अॅरॅगॉं नांवाच्या प्रांतांतील सर्व खेडीं या प्रयोगांत सामील झालीं होतीं आणि तीं तीन महिन्यांच्या आंत सार्वजनिक सहकार्याच्या तत्वावर शेती करूं लागलीं होतीं. हा प्रयोग फॅसिझमच्या विरोधकांनी केला होता आणि त्यांनी सर्व स्थानिक अधिकाऱ्यांना काढून टाकून त्यांच्या जागीं वेगवेगळ्या समित्या नेमल्या, आणि प्रथम सार्वजनिक हिताच्या दृष्टीने काय केलें पाहिजे हें ठरवण्याकरतां प्रत्येक खेड्यांत सर्व रहिवाशांच्या सभा बोलावल्या. या सभांत पिकांची कापणी आणि मळणी करण्याकरतां कांही गटांची योजना केली आणि हें पीक सर्वांच्या मालकीचें ठरवून त्याचें जरूरीप्रमाणें वांटप करण्याचें काम स्थानिक समित्यांवर सोंपवलें आणि ज्यांना कपड्यांची अधिक जरूर असेल त्यांना धान्याअैवजीं कपडे पुरविण्याचीही व्यवस्था केली.

या अेकंदर योजनेंत शेंकडा ७५ लहान शेतकरी सामील झाले आणि जे झाले नाहीत त्यांच्यावर जुलूम केला नाही आणि कारखान्यांतील मालाच्या वांटपांत त्यांचा तरीदेखील समावेश केला. कोणावरही जुलूम करायचा नाही, हें तत्व रशियांत मुळीच नव्हतें, आणि लेनिनने शेतकऱ्यांवर जो जुलूम केला, त्याच्या परिणामीं जमिनीची योग्य लागवड न होऊन जगांतला सर्वांत भयंकर दुष्काळ रशियाला भोगावा लागला, आणि त्यावेळीं रशियाला कोणतीही मदत करायला अितर देश तयार नव्हते, कारण रशियांतील क्रांतीनें अितर देश घाबरून गेले होते.

याच पद्धतीने अलकॉय नांवाच्या शहरांत सप्टेंबर १९३६ मधे अेक कापडसमिति नेमली जाऊन तिने ४१ कापडाच्या गिरण्या, ८ गंजीफ्राक वगैरे करणारे कारखाने, दहा सुताच्या गिरण्या, चार कापड रंगवण्याचे कारखाने, वगैरे आपल्या ताब्यांत घेतले, म्हणजे अलकॉय येथील सर्व कापडाची निर्मिति त्यांच्या ताब्यांत आली. प्रत्येक कारखान्यांतल्या कामगारांची अेक समिति नेमून अशाच प्रतिनिधींची अेक समिति अेकंदर निर्मितीचें नियंत्रण करण्याकरतां नेंमली. यांत कामगारांप्रमाणेंच कारकुनांचेही प्रतिनिधि होते.

सर्व उद्योगधंद्यांची अशीच व्यवस्था यशस्वी रीतीनें लावली होती आणि अशा रीतीने अलकॉय येथील वीस हजार कामगार काम करीत होते. तेथे भांडवलवाले नव्हते, भागीदारांच्या कंपन्या नव्हत्या आणि त्यांच्या कारभारांत कोणीही ढवळढवळ करीत नव्हतें. यामुळे कच्च्या मालाचा आणि मानवी श्रमाचा समंजसपणें उपयोग होत होता.

याचप्रमाणें बार्सेलोनामधें नेआण करण्याची व्यवस्था सार्वजनिक होती. कॅटॅलोनिआमधें आरोग्याची समिति अितकी यशस्वी झाली की अगदी अेकीकडे पडलेला शेतकरी आजारी पडला, तर ताबडतोब शेजारच्या खेड्यांतला डाक्तर त्याच्या मदतीला जात असे आणि जरूर तर त्याला गाडींतून जवळच्या इस्पितळांत नेण्याचीही व्यवस्था होत असे. स्पेनमधील अेकंदर परिस्थितीमुळे हा प्रयोग जरी फार दिवस टिकला नाही, तरी कोणत्याही प्रकारचें सरकार असल्या-

शिवाय किती यशस्वी रीतीने सर्व जरूर ते कारभार चालवतां येतात, हें जगाला दाखवण्याअितका तो टिकला होता.

अर्थात् तेथें कोणाचें राज्यच नसल्यामुळे राजकीय पक्षोपपक्ष आणि त्यांतलीं भांडणेंही नव्हतीं. मतभेद झाले तर ते एखादें पीक केव्हां कापायचें याबद्दल व्हायचे, आणि त्याकरतां सर्वांत अनुभवी माणसांचा निकाल मान्य करण्यांत कोणाचें नुकसान नव्हतें. पुष्कळांना असा प्रश्न पडतो की शेतकीला आणि कारखान्यांना ही व्यवस्था लावतां आली, तरी सरकारच नसलें तर कर कोण बसवणार, आणि ते वसूल कोण करणार? सैन्याची व्यवस्था कशी करणार? पण सर्वच व्यवस्था जेथे सार्वजनिक आहे, तेथे कर बसवण्याचें कारणच रहात नाही, आणि सहकार्याचें तत्व सर्वांनी मान्य केल्यास सैन्याचें कारण काय? हें तत्व मान्य झालें नाही तोंवर युद्धें चालतील आणि तें मान्य केल्याशिवाय तीं थांबणार नाहीत हें उघड आहे. दुसऱ्याला लुबाडून आपण गबर व्हावें, हीच दृष्टि असेल तर कोणताही समाज सुखी होणार नाही आणि युद्धेंही याच दृष्टीने होतात.

अशा दृष्टीने समाजवाद अमलांत आला तरच त्यांत कांही अर्थ आहे. रशियांतील समाजवाद हा केवळ नांवाला समाजवाद आहे, खरा समाजवाद तेथे नाही, कारण जुलूम करण्याला तेथे भरपूर वाव आहे, आणि समान हक्कांचें नांव नाही. फक्त सर्वांना अन्नवस्त्र मिळाल्याने लोक सुखी होत नाहीत, आणि सुख हेंच समंजस माणसांचें ध्येय असलें पाहिजे.

---

# गणपति उत्सव

लेखक, डॉ. श्री. भि. गाडगीळ, अेफ्. आर्. सी. अेस्.

देवांच्या उत्सवांमधें गोरगरिबांना आवडणारे उत्सव किंवा यात्रा यांचेंच स्तोम आपणास विशेषेंकरून दिसतें. गोविंदा, गणपति, रंगपंचमी, होळी, वगैरे उत्सवांत आरडाओरड, नाचगाणें व मद्य पिणें, यांनीच विशेष रंग येतो. हे

उत्सव अीश्वरभक्तीमुळे होतात असें कित्येक लोक म्हणतील, परंतु कालसिमारे होणारे बकऱ्यांचे वध किंवा पूर्वी रोमन लोकांच्या देवांपुढें दिलेले बळी पाहिले, म्हणजे यांत फक्त देवादिकांनाच आनंद होतो, की नातलग, अिष्टमित्र वगैरेंची भेट, आणि कपडे आणि दागिने यांचें प्रदर्शन, यांमुळे भक्तांना आनंद होतो, हा प्रश्नच आहे. देवतांना यामुळे आनंद होअील की काय हा विचारच कोणाला सुचत नाही. हत्तीच्या डोक्याचे किंवा सिंहाच्या तोंडाचे देव, तीन मुखांचे अीश्वर, किंवा दहा हातांच्या देवता, वगैरेंच्या अस्तित्वाविषयी कोणी फारशी चर्चा करीत नाहीत आणि अनुष्ठानें किंवा अभिषेक केल्याने पाऊस पडेल की काय याबद्दलही लोकांच्या मनांत बराच संशय असतो, तरीही हे सर्व प्रकार होत असतातच.

पूर्वी रोमन लोकांचे राजे अशा उत्सवांत भाग घेत असत, पण ते देखील भक्तीमुळे नसून राजे म्हणून आपला बडेजाव व्हावा हाच त्यांचा उद्देश असे. अग्नि, वरुण, वगैरे वेदांतल्या देवांची पूजा होमहवनांनी होत असे, परंतु त्यांचीं देवळें बांधलेलीं नव्हतीं. सुशिक्षितांना अजूनही अरुण व अग्नि यांना एका तऱ्हेने देव मानलेलें अधिक आवडेल यांत शंका नाही. पुष्कळ लोक नवीं देवळें बांधतात, किंवा जुन्यांचा उद्धार करतात, त्यांत यात्रेकरूंची सोय हा अेक हेतु असतोच, परंतु देवांचा गौरव व्हावा यापेक्षा स्वतःचें नांव अजरामर व्हावें हाच त्यांतला मुख्य हेतु असतो.

शंकराचार्यांचे गादीकरतां निवडलेल्या लोकांना विकट वादग्रस्त प्रश्न सोडवण्याची मोठीशी अिच्छा असते असें नाही, पण अशा जागेकरतां विद्वानांनी आपल्याला निवडलें आणि जन्माची निश्चिती झाली, आणि पूर्वींच्या कांही विद्वा-नांच्या पदवीला आपण पोहोंचलों, यामुळे होणाऱ्या गौरवाबद्दल वाटणारा अभि-मानच जास्त असतो. अीश्वराविषयी पूज्यबुद्धि तेथे नांवालाच असते.

हिंदु धर्मावर पाश्चात्य शिक्षणाचा अेक विशिष्ट परिणाम झाला आहे. हिंदु देवदेवतांना कोणी पदच्युत केलेलें नाही आणि त्यांचे उत्सवही होतच असतात, परंतु या देवतांवर फारच थोड्या लोकांचा विश्वास असतो. रामायण, महाभारत

वगैरे ग्रंथांतील धडधडीत खोट्या वर्णनांवर आतां कोणी विश्वास ठेवीत असेल असें वाटत नाही. त्रिकाळ संध्या कदाचित् कांही लोक करीत असले, तरी कोर्टांत उच्चारायच्या शपथेप्रमाणें तो अेक तांत्रिक प्रकार असतो. संध्या पाठ म्हणतां आली तरी त्यांतल्या वाक्यांचा अर्थ किती लोकांना कळतो ? आतां धर्मावर श्रद्धा जशी राहिली नाही, तशीच धर्माकरतां प्राणत्याग करण्याची तयारीही हिंदूंत राहिली नाही. रोजच्या आहाराच्या संवयीप्रमाणें धर्म ही अेक संवय झाली आहे. दुष्काळ, लढाया, रोगांच्या सांथी, वगैरेवर योग्य उपाय जेव्हां सांपडलेले नसतात, तेव्हा धार्मिक उपाय योजून कांही लोक आपल्या मनाचें समाधान करून घेतात अितकेंच.

---

# पत्रव्यवहार

१. पुढील शंकांचें निरसन कराल अशी आशा आहे. तारीख १५–८ चे लोकमान्यांत ' मधुमेहावर उत्तम औषध ' म्हणून जाहिरात भली मोठी दिलेली आहे. तरी या बाबतींत पुढील हकीकत घडली. तारीख १५–६ पासून आम्ही आमचे माघारणीचे डोळ्यांचे रोगाकरतां दापोली दवाखान्यांत सुमारें वीस दिवस असतांना तेथील मोडक वकील मधुमेहाचे आजाराने आमचेच खोलींत होते. तेथे आठ दिवस उपचार झाल्यावर मुंबईस गेले व मुंबईत पायाचें ऑपरेशन केल्यावर स्वर्गवासी झाले. तरी सदरहू औषध खात्रीचें आहे काय ? अेखाद्याच्या घरांत मनुष्य आजारी पडल्यावर भगत, वैद्य, डाक्तर, ज्योतिषी सांगेल तसें वागणें भाग पडून मनुष्य भांबावतो व त्याचा फायदा घेऊन कांही लोक पैसे उकळतात (सर्वच नव्हे). तरी हल्ली 'तीन दिवसांत औषधाने कायमची संतति बंद' 'चोवीस तासांत ऋतुप्राप्ति' वगैरे जाहिराती सर्व वर्तमानपत्रांतून असतात, परंतु त्या कितपत खऱ्या असतात तें राम जाणे ! तसेंच आपल्या मासिकांत खोट्या जाहिरातींबद्दल सरकार लवकरच कायदा करणार आहे असें वाचल्याचें आठवतें. तरी काळा बाजार, लांचलुचपती, अिकडे सरकार लक्ष देतें, त्यापेक्षा

खोट्या जाहिराती कमी गुन्ह्याच्या असतात काय? २ आपले आगस्टचे अंकांत 'प्रजोत्पत्तीचा परवाना' या मथळ्याखाली लेख आला आहे, त्याचेवर आपण 'कमाल मर्यादेची वाट पाहण्याचें कारण नाही' असें लिहिलें आहे. तरीं आतांपासूनच करावें की काय? तसेंच आपण गांधीयुगांत या गोष्टी होणार नाहीत म्हणून शेरा मारला आहे. तरी गांधी हे अमेरिकेचे पुढारी नाहीत, ते स्वतंत्र असल्यामुळे वाटेल तो निर्णय घेऊं शकतात असें वाटतें. तसेंच 'दशांश पद्धतीच्या नाण्यांचे फायदे देखील ज्यांना कळत नाहीत, त्यांना या गोष्टी कोठल्या सुचायला?' असें म्हटलें आहे. तरी कांग्रेसमधें असलेलीं सर्वच माणसें आडाणी नाहीत. त्यांना दशांश पद्धतीचे फायदे कळतात, अितकेंच नव्हे तर सर्व शिक्षकवर्गाला देखील अेवढें कळतें की मुलें पांच व दहांचे पाडे अितके बिनचुक म्हणतात, याचें कारण दशांश पद्धत सोपी हेंच आहे. परंतु कांग्रेसचीं सर्व सूत्रें गांधींचे मतावर अवलंबून असल्यामुळे त्यांचे मताशिवाय आज होणार नाही. त्यांनी वरील पद्धतीला अनुमोदन दिलें तर आज सुद्धां होअील. आपला

दत्तात्रय शिवराम चिखले

उ. १ वर्तमानपत्रांतील औषधांच्या जाहिराती अितक्या प्रमाणांत खोट्या असतात की औषधाच्या कोणत्याही जाहिरातीवर विश्वास न ठेवणें शहाणपणाचें होअील. शरीरांत 'पँक्रिआस' (स्वादुपिंड) नांवाचा अेक पिंड असतो, तो बिघडला म्हणजे मधुमेह होतो. त्यांत उत्पन्न होणाऱ्या स्रावाला 'अिन्सुलीन' म्हणतात, आणि हा पदार्थ शरीरांत टोंचणें अेवढा अेकच उपाय या रोगावर आजपर्यंत सांपडला आहे, याव्यतिरिक्त औषधांचा फारसा उपयोग होत नाही. संतति तात्पुरती किंवा कायमची बंद, ऋतुस्राव सुरू, वगैरे जाहिराती तर निव्वळ खोट्या समजाव्या, त्यांत बिलकुल तथ्य नाही. संततिनियमनाकरतां पोटांत घेण्याच्या कोणत्याही औषधाचा उपयोग होत नाही हें सर्व तज्ञांना माहीत आहे. कायदा करण्याचा बेत सरकारने जाहीर केला होता, परंतु तें सरकार वेगळें होतें. आतां मध्यवर्ती सरकार नवीन होण्याचें घाटत आहे, त्यांच्या डोक्यांत हा विचार येअील तेव्हां कायदा होअील. सरकारला

ज्यांतून प्राप्ति नाही असे कायदे लवकर होत नाहीत. अर्थात् दारूबंदीसारख्या गांधींच्या हुकुमाने होणाऱ्या गोष्टी वेगळ्या. २. होय, आमचे मतें प्रजोत्पत्तीला आतांपासूनच परवान्याची व्यवस्था केल्यास मुळांतच रोगट संतति उत्पन्न होणार नाही, निदान विवाहापूर्वी वधूवरांना आरोग्याचा दाखला आणायला लावला तरी पुष्कळ काम होईल. अर्थात् विवाहाशिवाय होणाऱ्या संततीला याने आळा बसणार नाही, पण अशी संतति थोडी असते. अमेरिकेंत गांधी पुढारी नसले तरी त्यांच्यासारख्याच धार्मिक लोकांचें वजन अतिशय आहे, म्हणूनच कोणतीही सुधारणा करणें कठिण जातें. कांग्रेसमधें सर्वच माणसें अडाणी नाहीत, पण जीं नाहीत त्यांनी आपली अक्कल गांधींना विकली आहे. जे कांग्रेसवाले गांधींच्या विरुद्ध जाऊं शकतात, त्यांची काय दशा होते हें अनेक वेळां सिद्ध झालेलें आहे. याचें ताजें उदाहरण म्हणजे मध्यप्रांतातर्फे लोकनायक अणे यांना घटनासमितींत घ्यावें याकरतां अनेकांनी केलेली खटपट केवळ गांधींच्या हट्टामुळे फुकट गेली, आणि याचें कारण अेकच की अण्यांनी गांधींना विरोध करण्याचें धैर्य दाखवलें होतें. गांधींसारख्या हुकूमशहांना विरोध कसा सहन होणार? नाण्यांचे बाबतींत त्यांतल्या त्यांत अेक बरें आहे, की व्यापारी मंडळांनी दशांश पद्धतीचा पुरस्कार केला आहे. पण आतां मध्यवर्ती सरकार देखील कांग्रेसच्या हातीं गेलें, म्हणजे कोणी कितीही शंख केला तरी गांधींच्या मर्जीविरुद्ध अेक पान हालणार नाही, आणि गांधींना दशांश पद्धतीचे फायदे कळत नाहीत. तेव्हां गांधींच्या हयातींत ही सुधारणा अंमलांत येणें कठिण. त्यांना विरोध करणारे कोण, तर मुसलमान आणि अस्पृश्य समजलेले लोक. हे दोन्ही वर्ग मागसलेले असल्यामुळें ते नवीन गोष्टींना विरोधच करण्याचा संभव फार. **सं.**

---

# शारदेचें पत्र

जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत अ. भा. महिला परिषदेच्या स्थायी

संमितीची बैठक कलकत्ता येथे भरून तिने अितर अनेक ठरावांबरोबरच हिंदी स्त्रियांच्या हक्कांची अेक सनद मंजूर केली. अध्यक्षस्थानीं सौ. हंसा मेहता या होत्या आणि समितींत आणखीही विदुषी मानलेल्या स्त्रिया असतीलच, पण त्यांनी मंजूर केलेल्या सनदेवरून त्यांना सामाजिक विषयांचें फारसें ज्ञान असावेंसें दिसत नाही. सर्व बाबतींत स्त्रियांना पुरुषांचे बरोबरीने लेखावें, हा त्यांचा मुद्दा योग्यच आहे, परंतु कायद्याने काय होऊं शकतें आणि काय होऊं शकत नाही, याचा त्यांनी फारसा विचार केलेला दिसत नाही. उदाहरणार्थ बालविवाह आणि अस्पृश्यता हीं थोड्याबहुत प्रमाणांत तरी कायद्याने नाहीशीं करतां येतील हें खरें, पण तेथेही अनुभव असा येतो की बालविवाहाविरुद्ध हल्ली कायदा असूनही कित्येक लोक तो जाणूनबुजून मोडतात आणि त्याबाबत होणारा दंड विवाहाच्या खर्चांत धरतात. विवाहाकरतां पुष्कळ लोक अितका पैसा खर्च करतात की त्या मानाने हा दंड म्हणजे मोठीशी बाब नसते. अस्पृश्यतेच्या बाबतींत कायदा केला तर अस्पृश्यांना कोठेही मज्जाव करतां येणार नाही हें खरें, पण अस्पृश्यांपासून दूर राहणाऱ्या लोकांच्या मनावर अशा कायद्यांचा परिणाम होत नाहीं. याचा अर्थ जनतेला नको असलेल्या गोष्टी जनतेवर लादणें सोपें नसतें.

ही सनद अजून तपशीलवार प्रसिद्ध झालेली नाही, परंतु वेश्यांचा व्यवसाय जरूर तर कायद्याने बंद करावा अशी मागणी तींत आहे. असे प्रयत्न फार प्राचीन कालापासून होत आले आहेत आणि त्यातला अेकही कधी यशस्वी झालेला नाही, अशी अितिहासाची साक्ष आहे. पण वेश्याव्यवसाय नीतिबाज लोकांनी वाअीट ठरवलेला आहे, तेव्हां त्याविरुद्ध कायदा केलाच पाहिजे, अेवढेंच या समितीला कळतें. शक्याशक्यतेकडे पहायचें त्यांचें काम नाही. ही त्यांच्या नीतिबाजीची आहिरात आहे. अशीच जाहिरात करण्याकरतां कांग्रेससरकार दारूबंदी करीत असतें, तेव्हां ही आणखी अेक जाहिरात करण्याकरतां या बाबतींतही ते कदाचित् कायदा करतील, परंतु त्याचा कोणताही उपयोग होणार नाही हें उघड दिसतें. सक्तीच्या अेकपत्नीत्वाची मागणी

ज्यांतून प्राप्ति नाही असे कायदे लवकर होत नाहीत. अर्थात् दारूबंदीसारख्या गांधींच्या हुकुमाने होणाऱ्या गोष्टी वेगळ्या. २. होय, आमचे मतें प्रजोत्पत्तीला आतांपासूनच परवान्याची व्यवस्था केल्यास मुळांतच रोगट संतति उत्पन्न होणार नाही, निदान विवाहापूर्वी वधूवरांना आरोग्याचा दाखला आणायला लावला तरी पुष्कळ काम होईल. अर्थात् विवाहाशिवाय होणाऱ्या संततीला याने आळा बसणार नाही, पण अशी संतति थोडी असते. अमेरिकेंत गांधी पुढारी नसले तरी त्यांच्यासारख्याच धार्मिक लोकांचें वजन अतिशय आहे, म्हणूनच कोणतीही सुधारणा करणें कठिण जातें. कांग्रेसमधें सर्वच माणसें अडाणी नाहीत, पण जीं नाहीत त्यांनी आपली अक्कल गांधींना विकली आहे. जे कांग्रेसवाले गांधींच्या विरुद्ध जाऊं शकतात, त्यांची काय दशा होते हें अनेक वेळां सिद्ध झालेलें आहे. याचें ताजें उदाहरण म्हणजे मध्यप्रांतातर्फे लोकनायक अणे यांना घटनासमितींत घ्यावें याकरतां अनेकांनी केलेली खटपट केवळ गांधींच्या हट्टामुळे फुकट गेली, आणि याचें कारण अेकच की अण्यांनी गांधींना विरोध करण्याचें धैर्य दाखवलें होतें. गांधींसारख्या हुकूमशहांना विरोध कसा सहन होणार ? नाण्यांचे बाबतींत त्यांतल्या त्यांत अेक बरें आहे, की व्यापारी मंडळांनी दशांश पद्धतीचा पुरस्कार केला आहे. पण आतां मध्यवर्ती सरकार देखील कांग्रेसच्या हातीं गेलें, म्हणजे कोणी कितीही शंख केला तरी गांधींच्या मर्जीविरुद्ध अेक पान हालणार नाही, आणि गांधींना दशांश पद्धतीचे फायदे कळत नाहीत. तेव्हां गांधींच्या हयातींत ही सुधारणा अंमलांत येणें कठिण. त्यांना विरोध करणारे कोण, तर मुसलमान आणि अस्पृश्य समजलेले लोक. हे दोन्ही वर्ग मागसलेले असल्यामुळें ते नवीन गोष्टींना विरोधच करण्याचा संभव फार. **सं.**

---

# शारदेचें पत्र

जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत अ. भा. महिला परिषदेच्या स्थायी

संमितीची बैठक कलकत्ता येथे भरून तिने अितर अनेक ठरावांबरोबरच हिंदी स्त्रियांच्या हक्कांची अेक सनद मंजूर केली. अध्यक्षस्थानीं सौ. हंसा मेहता या होत्या आणि समितींत आणखीही विदुषी मानलेल्या स्त्रिया असतीलच, पण त्यांनी मंजूर केलेल्या सनदेवरून त्यांना सामाजिक विषयांचें फारसें ज्ञान असावेंसें दिसत नाही. सर्व बाबतींत स्त्रियांना पुरुषांचे बरोबरीने लेखावें, हा त्यांचा मुद्दा योग्यच आहे, परंतु कायद्याने काय होऊं शकतें आणि काय होऊं शकत नाही, याचा त्यांनी फारसा विचार केलेला दिसत नाही. उदाहरणार्थ बालविवाह आणि अस्पृश्यता हीं थोड्याबहुत प्रमाणांत तरी कायद्याने नाहीशीं करतां येतील हें खरें, पण तेथेही अनुभव असा येतो की बालविवाहाविरुद्ध हल्ली कायदा असूनही कित्येक लोक तो जाणूनबुजून मोडतात आणि त्याबाबत होणारा दंड विवाहाच्या खर्चांत धरतात. विवाहाकरतां पुष्कळ लोक अितका पैसा खर्च करतात की त्या मानाने हा दंड म्हणजे मोठीशी बाब नसते. अस्पृश्यतेच्या बाबतींत कायदा केला तर अस्पृश्यांना कोठेही मज्जाव करतां येणार नाही हें खरें, पण अस्पृश्यांपासून दूर राहणाऱ्या लोकांच्या मनावर अशा कायद्यांचा परिणाम होत नाहीं. याचा अर्थ जनतेला नको असलेल्या गोष्टी जनतेवर लादणें सोपें नसतें.

ही सनद अजून तपशीलवार प्रसिद्ध झालेली नाही, परंतु वेश्यांचा व्यवसाय जरूर तर कायद्याने बंद करावा अशी मागणी तींत आहे. असे प्रयत्न फार प्राचीन कालापासून होत आले आहेत आणि त्यातला अेकही कधी यशस्वी झालेला नाही, अशी अितिहासाची साक्ष आहे. पण वेश्याव्यवसाय नीतिबाज लोकांनी वाअीट ठरवलेला आहे, तेव्हां त्याविरुद्ध कायदा केलाच पाहिजे, अेवढेंच या समितीला कळतें. शक्याशक्यतेकडे पहायचें त्यांचें काम नाही. ही त्यांच्या नीतिबाजीची आहिरात आहे. अशीच जाहिरात करण्याकरतां कांग्रेससरकार दारूबंदी करीत असतें, तेव्हां ही आणखी अेक जाहिरात करण्याकरतां या बाबतींतही ते कदाचित् कायदा करतील, परंतु त्याचा कोणताही उपयोग होणार नाही हें उघड दिसतें. सक्तीच्या अेकपत्नीत्वाची मागणी

महिलांनी केलीच आहे आणि तसा कायदा करणें सोपें आहे, पण त्याचे परिणाम मात्र चांगले होणार नाहीत. अशा कायद्याने उघड किंवा गुप्त रखेल्यांची संख्या वाढेल, अितकेंच नव्हे तर हल्ली चांगल्या सुशिक्षित स्त्रिया देखील विवाहाशिवाय पुरुषांजवळ पत्नीसारख्या राहूं लागल्या आहेत आणि अशा स्त्रियांची संख्या अशा कायद्याने वाढेल. स्त्रीपुरुषांचे सबंध कायद्याने नियंत्रित करूं नयेत, या बाबतींत शक्य तितकें स्वातंत्र्य सर्वांस असावें, असें म्हणणाऱ्या माझ्यासारख्यांना याचें मुळींच वाअीट वाटणार नाही, पण कायदा करणारांचा हेतु मात्र त्यांत साधणार नाही, अितकेंच नाही तर हल्ली कांही स्त्रियांवर वेडावांकडा प्रसंग आल्यास त्यांतून विवाहाने मुक्त होण्याची शक्यता असते, त्यांना असा कायदा झाल्यावर वेश्यावृत्तीचा मार्ग पतकरावा लागेल, हें या नीतिवाज महिलांना बजावून सांगणें जरूर आहे. कदाचित् याचकरतां त्यांनी वेश्याव्यवसाय कायद्याने बंद करण्याचा घाट घातला असेल, परंतु ही गोष्ट अशक्य आहे. हा कायदा अेकंदर स्त्रियांना हितावह होणार नाही. फक्त विवाहित स्त्रियांना तो फायदेशीर वाटेल, पण तो भ्रम आहे, त्यांचाही त्यांत फायदा होणार नाही. लोकशाहीच्या युगांत ही मक्तेबाजी चालणार नाही. अेकेरी विवाहपद्धति ही मक्तेबाजीची पद्धत आहे, पण व्यवहारांत ती चालणें शक्य नसतें. अशा कायद्यांनी कित्येक स्त्रीपुरुषांचा संभोगसुखाचा हक्क जबरदस्तीनें हिरावून घेतला जातो. कित्येक स्त्रीपुरुषांना अन्न मिळूं नये अशी व्यवस्था जर कायद्याने केली, तर अशीं स्त्रीपुरुषें अन्नाची चोरी केल्याशिवाय राहणार नाहीत, आणि अशा चोरीला मी तरी अनीति म्हणणार नाही. कामतृप्तीची गरज अन्नासारखीच आहे. अेखादे वेळीं अन्न कमी मिळालें तरी चालेल, पण ही गरज भागली पाहिजे, अशी वृत्ति पुष्कळांची असते. अन्न सर्वांनाच मिळणें जरूर असतें आणि समागमाचे बाबतींत शेंकडा अेक माणसांना ही गरज भासत नाही, अितकाच या दोहोंत फरक आहे. हा फरक विशेष लक्षांत घेण्यासारखा नाही, पण या बाबतींत लोकांना सरळ विचारच करतां येत नाही. स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने हक्क जरूर मागावे, परंतु त्याकरतां आपले हक्क वाढवण्याची

खटपट करणें हा मार्ग समंजस आहे, पुरुषांचे हक्क कमी करून बरोबरी करा म्हणणें, हा मूर्खपणा आहे.

हल्ली मुंबअीं आणि अितरत्र जी संपांची सांथ आली आहे तीवरून कामगार हल्ली किती स्वार्थी होत चालले आहेत हें कोणालाही समजेल. त्यांना पाठिंबा देणाऱ्या कॉम्युनिस्टांना विशेष तारतम्य नसतें हें जनतेला अगोदरच माहीत आहे. काळ्या बाजारामुळें फाजील फुगलेल्या किंमती या संपांच्या योगाने आणखी फुगतील, कारण पगार जास्त मिळाल्यास लोक किंमतही जास्त देतात. किंमती आणखी फुगल्या म्हणजे आणखी पगारवाढीच्या मागण्या ठरलेल्याच, आणि जनतेची अडवणूक केली म्हणजे त्या मिळणार ही खात्रीच.

आज कापडाचा दुष्काळ पडला आहे, त्याचीं प्रमुख कारणें म्हणजे गिरणीकामगारांचे संप आणि कांग्रेस सरकारने पुकारलेले हरताळ. या हरताळांचा आणि संपांचा आणखी अेक दुष्परिणाम म्हणजे संप असो की हरताळ असो, त्या सबबीवर शाळांतलीं मुलें जबरदस्तीने सुटी घेतात आणि शाळा चालू राहिल्यास आंतल्या मुलांमुलींना दगड मारतात. हें उदाहरण कांग्रेसनेच घालून दिल्यामुळे मुलांना उत्तेजन मिळालें आहे आणि कांग्रेसकडून आजपर्यंत याचा कोणताही बंदोबस्त होत नाही. शिक्षणाच्या बाबतींत हल्ली मुलांकडे सर्वाधिकार आला आहे, मग कांग्रेसचे शिक्षणमंत्री काय कामाचे ?

कामगारांना तर कोणाची कितीही गैरसोय झाली तरी पर्वा नसते, आपलें काम साधलें म्हणजे झालें. शिवाय कित्येक बाबतींत अव्यवस्थेमुळे देखील लोकांची गैरसोय होते. आठवड्यांतून अेक दिवस तरी दुकान बंद केलें पाहिजे, असें गुमास्ता कायद्यांत सांगितलेलें नाही, प्रत्येक गुमास्त्याला आठवड्यांतून अेक सबंध दिवस रजा मिळाली पाहिजे, असा कायदा आहे. फराळाच्या दुकानांचे बाबतींत पहावें तर अिराण्यांची दुकानें कधीही बंद नसतात, पण हिंदू दुकानें मात्र आठवड्यांतून अेक दिवस बंद असतात. याचा अर्थ मला अितकाच दिसतो की अिराण्यांना या बाबतींत योग्य व्यवस्था करून गुमास्त्यांना पाळीपाळीनें रजा देतां येते. मग हिंदु दुकानांनाच तसें कां करतां येत नाही ?

ही जनतेबद्दलची बेपर्वाअी आहे आणि मालकांचा देखील त्यांत फायदा नाही. पुष्कळ लोक अशा दुकानांतच दररोज जेवतात, त्यांना आठवड्यांतून अेकच दिवस दुसरीकडे जावें लागतें आणि मनासारखें अन्न मिळत नाही. अशी स्थिति सुधारलेल्या देशांत कोठेंही नाही. अिंग्लंडांत धर्मवेडामुळे रविवारीं बरींच दुकानें बंद असतात, पण सर्वच नसतात, आणि यूरोपांतील अितर देशांत तर कधीच बंद नसतात. जेथे जनतेच्या हिताचा प्रश्न आहे, तेथें कायदे संभाळून करावे लागतात आणि जनतेच्या हिताकडे दृष्टि ठेवून पाळावे लागतात. आगगाड्या जशा रविवारीं बंद नसतात, तशाच खाण्यापिण्याच्या सोयीही बंद होतां नयेत. याबद्दल कायदा करावा असें मी म्हणत नाही, पण मालकांनी समंजसपणा दाखवला पाहिजे.

महाराष्ट्र-अेकीकरणाकरतां जी समिति नेमली आहे, तिचे अध्यक्ष शंकरराव देवांना नेमले आहेत, परंतु अध्यक्षपदाला ते नालायक आहेत हें त्यांनी येथल्या परिषदेंतच सिद्ध केलेलें आहे. त्या सभेंत मराठीशिवाय कोणतीही भाषा बोलूं दिली नसती तर तें शोभलें असतें, पण तथाकथित राष्ट्रभाषेबद्दल पक्षपात करून त्यांनी अेका मुसलमानाला उर्दू बोलूं दिलें आणि नंतर गोव्याच्या अेका क्रिस्ती गृहस्थांनी अिंग्रजींत बोलण्याची परवानगी मागितली तेव्हां त्यांनी दिली नाहीं. हे गृहस्थ ठरावाला विरोध करणार होते असे म्हणतात. असें असेल तर तें अधिकच वाअीट ठरतें. पक्षपात आणि दडपशाही हे गुण अध्यक्षांच्या अंगीं नसलेले बरे हे कोणीही कबूल करील. पण आज कांग्रेसचें राज्य आहे आणि शंकरराव देवांना या राज्यांत वजन आहे. अेका वक्त्याने जें सांगितलें की हिंदुस्थानांतल्या पहिल्या दहा माणसांत शंकरराव देवांची गणना करावी लागेल, तेंही याच अर्थाने असावें. ‘देवो दुर्बलघातकः’ ही म्हण शंकररावांनी सार्थ करून दाखवली.

तुझी **शारदा.**

---

# प्री ति नि त्या ग

या दोन दैवी
भावनांची कलात्मक
गुंफण करणारा—

**मिनर्वाचा नवा**
**सामाजिक बोलपट**

# श मा

निर्माते—**सोराब मोदी**

- भूमिका -

**अभिनयसम्राज्ञी**

## मे ह ता ब

**वास्ती, अबूबकर,**
**प्रकाश, मा. रतन.**

- संगीत -

**गुलाम हैदर**

## चौथा महिना

# मिनर्व्हा

**पटगृहांत धडाक्यानें चालू आहे.**

## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर.

**कोल्हापूर:** स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांव:** जे, एम्. माणूरकर, खडे बाजार.

**अहमदनगर:** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

**औरंगाबाद :** मो. प. मुळे, बुकसेलर, खारा कुवा.

**मडगांव, गोवा:** मा. पं. रायकर

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**ग्वाल्हेर :** डोके ब्रदर्स, लष्कर.

**बेलापूर रोड :** ना. अ. पेंडसे.

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**नागपूर :** सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

**बारामती :** मोहन बुकडेपो.

**अमरावती :** अण्णा व्ही. काळे

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**वार्षिक वर्गणी :** मनीआर्डरीने दोन रुपये, व्ही. पी. ने सवादोन.

## आमचेकडे मिळणारा माल

| | | |
|---|---|---|
| **डच कॅप** प्रत्येकीं, | ... ... ... | रु. ५. |
| **उभट टोपी** ( लहान, मध्यम किंवा मोठी ), प्रत्येकीं | ... | रु. २. |
| **राअिट जेली** ( आम्ही बनविलेली ), | ... | रु. ३॥. |
| **राअिट हेअर लोशन** | ... ... ... | रु. ३. |
| **कामोत्तेजक नं. १** ( बरेच दिवस घेण्याकरतां ), | .... | रु. ४. |
| **कामोत्तेजक नं. २** ( प्रसंगीं घेण्याकरितां ) ... | ... | रु. ६. |
| **कषायचूर्ण** ( योनिमार्ग धुण्याकरतां सुवासिक, आकुंचक चूर्ण ), बाटली | ... ... | रु. २॥. |

**राअिट अेजन्सी,** १३, नवी भटवाडी, मुंबई–४.

## नवीन सामाजिक नाटक

# न्यायाचा शोध

## ( चार अंकी गद्य–संगीत नाटक )

लेखक, **र. धों. कर्वे**, अेम्. अे.

**किंमत १ रु., ट. ख. ४ आणे.**

या नाटकांतील पद्यें वगळल्यास तें गद्य नाटक होअील, त्यांत अितर कोणताही फरक करावा लागणार नाही. या नाटकांत लेखकाने कोणताही प्रचार करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

**राअिट अेजन्सी,** नवी भटवाडी मुंबई–४.



## स म ता – सं घ

हा पुणें येथे प्रो. धों. के. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाला असून त्याचें अेक केंद्र आतां महाराष्ट्र-उत्कर्ष-मंडळाच्या कचेरींत, ४० पिकेट रोड, मुंबई-२, येथें उघडलें आहे. याचे उद्देश थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहेत. १ विशेषतः महाराष्ट्रामधें समतेच्या तत्वाचा प्रसार करणें. २ या कामीं लोकमत तयार करण्यासाठी व्याख्यानें करवणें, पत्रकें, पुस्तिका व अेखादें नियतकालिक प्रसिद्ध करणें. ३ भिन्नजातीयांमधें, भिन्नधर्मीयांमधें व आर्थिक दृष्ट्या भिन्नवर्गीयांमधें दळणवळण व स्नेह-संबंध उत्पन्न व्हावे म्हणून सभा, संमेलनें भरवणें, वगैरे. अधिक माहिती वरील केंद्रांत मिळेल.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ५आणे.
२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ६ आणे.
३. संततिनियमन [ साचित्र ], ८ वी आवृत्ति, किंमत १ रुपया, ट. ख. ४ आणे.
४. गुप्तरोगांपासून बचाव, ४थी आ. रु १, ट. ख. ४आणे.
५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट.ख.५आ.
६. त्वचेची निगा. किं. ८ आ., ट. ख. ४ आ.
७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ४ आणे
८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ५ आ.
९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ४ आ.
१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक माटक ) किंमत १ रु., ट. ख. ४

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५आं.
२. मूळव्याध. किं. ४ आ.

### श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,

१. मी कसा झालों ? किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

### प्रो. धों. के. कर्वे कृत

१. संक्षिप्त आत्मवृत्त, किं. १२ आणे ट. ख. ५ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.